(1)

दि. १४/०८/२०१६

प्रति,

**मा. सरपंच / ग्रामसेवकसो**
ग्रामपंचायत, पिशवी,
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

अर्जदार : (१) जालिंदर रंगराव इंगवले
(२) भैरवनाथ तरुण मंडळ सर्व सदस्य
(३) मौजे पिशवी गावचे ग्रामस्थ
मु.पो. पिशवी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

विषय : 'आमचं गाव, आमचा विकास' या ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन योजनेअंतर्गत मौजे पिशवी गावच्या मुख्य व गरजू तसेच पायाभुत प्रस्तावित सुविधांचा कार्यक्रम पुढील पाच वर्षे राबविणेबाबत आराखडा.

महोदय,

आम्ही अर्जदार मौजे पिशवी गावचे रहिवाशी असून, आम्ही सर्वजन एकत्र येऊन सर्वांच्या संगनमताने विचार करून मौजे पिशवी गावच्या मुलभूत सुविधा, गरजा व सुधारणांचा प्रस्तावित आराखडा विस्तृत व सध्याच्या स्थितीचित्रासह (फोटो) खालीलप्रमाणे देत आहोत. आम्हा सर्वांची हीच अपेक्षा आहे की, प्रस्तावित केलेल्या आराखड्याचे काम दूरदृष्टी ठेवून पुढील ५० वर्षे सक्षम व कार्यरत राहील ही दखल घ्यावी ही नम्र विनंती.

*** प्रकरण - १ ***

**कोरड्या व दुष्काळी स्थितीपासून वाचण्यासाठी पर्यायी उपाय म्हणून गाव तळ्याची सुधारणा करणे.**

(अ) गाव तळ्यातील गाळ व कचरा काढणे

(ब) गावतळ्यातील सध्याची जी जनावरांना उतरण्यासाठी जागा आहे व लोकांना कपडे धुण्यासाठी जागा व पायऱ्या आहेत त्या जागेची उंच तटबंदी करून घेणे.

(क) जेणेकरून तळ्यामध्ये जनावरांचा थेट प्रवेश व लोकांचा थेट कपडे धुण्याची दिनचर्या बंद होईल व तळेही स्वच्छ राहील.

(ड) जनावरे व कपडे धुण्यासाठी वेगळी सुविधा करणे. व त्याचे सांडपाणी थेट तळ्यात न जाता त्या सांडपाण्याचा शेतीसाठी उपयोग होईल याची सुविधा करणे.

२१०१९६
ग्रामसेवक
ग्रामपंचायत पिशवी
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर.



Scanned by CamScanner

(इ) तळ्याची सध्याची स्थिती पाहता त्याची डागडुजी किंवा नुतनीकरणाची गरज आहे.

(ई) तळ्यामध्ये माशांचे उपयुक्त बीज आणून सोडणे व त्यांचे पालण करणे.



तळ्याची सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



तळ्याची सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner

*** प्रकरण - २ ***

**ग्रातील पिण्याच्या पाण्याची मुख्य सार्वजनीक टाकी व टाकीच्या आसपासची स्वच्छता, सुविधा व सुधारणा.**

**भाग - १ (टाकीची स्वच्छता व सुधारणा)**

(अ) पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या सभोवतालीचा परिसर स्वच्छ असावा व त्याची डागडुजी करावी.

(ब) सध्याची स्थिती पाहता सार्वजनीक पिण्याच्या टाकीच्या दक्षिण-पश्चिम दिशेस टाकीलगत कचऱ्याच्या ढिगाचे, झाडाझुडपांचे व मुतारीचे ठिकाण आहे. जे की सार्वजनीक पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी अयोग्य आहे.

(क) कचऱ्याच्या व मुतारीच्या तसेच टाकीच्या आसपासच्या पडीक ठिकाणी सिमेंट काँक्रीट करणे गरजेचे आहे. जेणेकरून पाणी साचून मच्छर व इतर जीवजंतू व त्यापासून रोग निर्माण होणे हे सर्व टाळता येईल.

(ड) कचरा कुंडीची सोय करणे.

(इ) उघड्यावर कचरा फेकू नये असा निर्देश फलक लावणे.

**भाग - २ (जनावरांना पाण्यासाठी हौद)**

(अ) सार्वजनीक पाण्याच्या टाकीच्या उत्तरेस सध्याच्या स्थितीमध्ये जनावरांसाठी जो पाण्याचा हौद आहे तो खूप जुना व मोडकळीस आलेला आहे. खड्डे आणि पाणी साचल्यामुळे मच्छर व जीवजंतूंचे स्थान निर्माण झालेले आहे.

(ब) जुन्या हौदाच्या ठिकाणी नवीन हौदाची व्यवस्था करणे व हौदांची संख्या वाढवणे.

(क) हौदाचा आकार वाढवूण त्याला सिमेंट काँक्रीट करणे.


**भाग - ३ (सांडपाण्याची व्यवस्था)**

(अ) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या व हौदाच्या लगत पश्चिम-उत्तर दिसेस सांडपाण्याची पडीक तळी आहेत. ती सध्याची स्थिती पाहता योग्यरित्या कार्यरत नाही.

(ब) त्या तळीचा योग्य प्रमाणात विस्तार वाढवून त्याठिकाणी तळीच्या आकाराचा दगड व काँक्रीटचा हौद बांधून घेणे. जेणेकरून भविष्यात त्याचा शेतीसाठी उपयोग होईल व गप्पी मासे पाळण्यासाठी उपयोग होईल.



Scanned by CamScanner




सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ साचलेला मातीचा व कचऱ्याचा ढीग दि. १६/०७/२०१६



सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ साचलेला मातीचा व कचऱ्याचा ढीग दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



सद्यस्थिती सार्वजनिक जनावरांचा पाण्याचा हौद दि. १६/०७/२०१६



सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



सद्यस्थिती सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ कचरा ढीग व मुतारी दि. १६/०७/२०१६

*** प्रकरण - ३ ***

**गावस्वच्छता, सुविधा व सुधारणा.**

**भाग - १ (गटारी/नाले)**

(अ) गावामधील बांधीव नसलेली गटारे व मोडकळीस आलेली गटारे बांधून घेणेत यावीत.

**भाग - २ (कचराकुंडी)**

कचराकुंडीसाठी प्रस्तावित ठिकाणे.

(अ) गावामध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ. (खोतवाडी रोड)

(ब) पाणंद रोड (शेंडावाडी) श्री. शिवाजी इंगवले यांचे घरासमोर.


(क) तळ्याकडील पाणंद रोड, मोरे गल्ली, मारुती मंदिर समोर.

(ड) थळाकडील गल्ली.


(इ) स्माशान भूमीकडील वस्ती.

(ई) प्रत्येक गल्लीनुसार उपयुक्त ठिकाणी किंवा प्रत्येक विजेच्या खांबाखाली छोट्या आकाराच्या ट्रॉलीप्रकारच्या कचऱ्याकुंड्या उपलब्ध करून देणे.

Scanned by CamScanner




गावातील गटारींची सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६




गावातील गटारांची सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६

Scanned by CamScanner



मधली गल्ली भैरवनाथ तरुण मंडळयेथील ३० वर्षापासून पडीक व तुंबलेले गटार सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६




मधली गल्ली भैरवनाथ तरुण मंडळयेथील ३० वर्षापासून पडीक व तुंबलेले गटार सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



अपेक्षित कचराकुंडीचे ठिकाण व सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



अपेक्षित कचराकुंडीचे ठिकाण व सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



अपेक्षित कचराकुंडीचे ठिकाण व सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner


## * प्रकरण - ४ *

### शेतकरी व शेतीउपयुक्त दळणवळणाचे मुख्य मार्ग.

पाणंद रोड हा शेतकऱ्यांच्या शेतीला व शेती व्यवसायाला जोडणारे दळणवळणाचे उपयुक्त असे मुख्य मार्ग आहे. याची दखल घेणे महत्त्वपूर्ण आहे. या पांदीचे नुतणीकरण एप्रिल/मे २०१६ मध्ये झालेली आहे. सध्याची परिस्थिती रोड तुटणारी आहे.

(अ) पाणंद शेंडावाडी रोड : सद्यस्थितीत या पाणंदीला साईटपट्टी व नालेही नाहीत व ती नवीण तयार करण्यासाठी जागाही नाही.

(ब) तळ्याकडील पाणंद : सद्यस्थितीत काही ठिकाणी साईटपट्टी व नाल्यासाठी जागाच शिल्लक नाही. तसेच काही ठिकाणी रोड तुटलेल्या अवस्थेत आहे.




शेंडावाडीकडील शेतीला जोडणारा रोड सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



तळ्याकडील शेतीला जोडणारा पाणंद रोड सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६




तळ्याकडील शेतीला जोडणारा पाणंद तुटत आलेला रोड सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



तळ्याकडील शेतीला जोडणारा पाणंद साईट पट्टी व नाला नसलेला रोड सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



तळ्याकडील शेतीला जोडणारा पाणंद रोडवरील नाल्यामधील कचरा सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner

# * प्रकरण - ५ *

**गावातील सर्व गल्लीतील बोळे काँक्रीटीकरण करणे व सांडपाणी मुख्य गटरांना सोडणे.**

बोळ कॉक्रीटीकरणासाठी प्रस्तावित ठिकाणे :


(अ) मधली गल्ली (भैरवनाथ तरूण मंडळ) या एकाच ठिकाणी असणारी दोन बोळे.


(ब) विठ्ठल मंदिरासमोरील (बामणाचा वाडा) येथील बोळ.

(क) सडकची गल्ली (शिवाजी इंगवले यांच्या घराजवळील) बोळ.

(ड) महादेव मंदिरासमोरील बोळ.

(इ) सैनिक कॉलनी येथील बोळ.






मधली गल्ली येथील दोन्ही बोळे सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner




विठ्ठल मंदिरासमोरील बामणाचा वाडा येथील बोळ सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६




सडकेची गल्ली शिवाजी इंगवले यांच्या घराजवळील बोळ सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



सैनिक कॉलनीतील बोळ सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



महादेव मंदीर समोरील बोळ सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner

## * प्रकरण - ६ *

**क्रीडांगण व वृक्षारोपण (वनीकरण)**

**भाग - १ : गायरान येथील क्रीडांगणाचे नुतनीकरण करणे व सभोवताली वृक्षारोपण करणे.**

(अ) मौजे पिशवी येथील गायरानमधील ओबड-धोबड क्रीडांगणाचे सुधारणा व नुतनीकरण करणे. तसेच क्रीडांगणाचे सुरक्षा व संवर्धन करणे.

(ब) क्रीडांगणावर बसण्यासाठी अपेक्षीत प्रमाणात फोरसीटर बाकडी उपलब्ध करणे.

(क) प्रौढ व वयस्कर व्यक्तींना मध्यम व हलक्या स्वरुपाचे व्यायामाचे साहित्य प्रत्यक्ष देवमाळावरील क्रीडांगणावर (कायमस्वरुपी बंधिस्त) उपलब्ध करून देणे.

(ड) क्रीडांगणासभोवती ट्री गार्ड सहीत ५०० झाडांचे वृक्षारोपण. (वनीकरण)

(इ) लावलेल्या झाडांना ठिबक पद्धती व स्वतंत्र पाण्याची व्यवस्था.

(ई) गायरानातील उत्खनन थांबविणे सक्तीचे करणे व थांबविण्याचे निर्देशफलक लावणे.

**भाग - २ : प्राथामिक ग्रामीण आरोग्य केंद्राच्या पुर्वेस असलेल्या पडीक जागेचे अंगणवाडीच्या चिंल्ड्रन पार्कसाठी नुतनीकरण करणे.**

(अ) पडीक जागेतील क्रीडांगण दवाान्याच्या समांतर उंचीवर चढवून घेऊन व सुरक्षित भिंत बांधून त्याठिकाणी लहान मुलांना खेळण्यासाठी चिंल्ड्रन पार्क बणविणे.

(ब) पेशंटना व महिलांना बसण्यासाठी दवाखान्याच्या आवारात व चिंल्ड्रन पार्कमध्ये फोरसीटरची सुविधा करणे.

(क) चिंल्ड्रन पार्कच्या सभोवती छायादार वृक्षांचे वृक्षारोपण (वनीकरण) करणे.



Scanned by CamScanner



गायरान येथील क्रीडांगणाची सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



गायरान येथील क्रीडांगणाजवळ झालेले उत्खनन सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



गायरान येथील क्रीडांगणाजवळ झालेले उत्खनन सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



गायरान येथील क्रीडांगणाजवळ झालेले उत्खनन सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



गायरान येथील क्रीडांगणाजवळ झालेले उत्खनन सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६

Scanned by CamScanner



प्राथमिक ग्रामीण आरोग्य केंद्र व त्याच्याजवळील प्रस्तावित
अंगणवाडी चिंल्ड्रन पार्कसाठी जागा सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६

*** प्रकरण - ७ ***

**व्यायाम शाळा :**

(अ) सध्याच्या जुन्या व पडीक व्यायाम शाळेच्या ठिकाणी नवीन व्यायाम शाळेचे नुतनीकरणे करणे.

(ब) व्यायाम शाळेत व्यायामाच्या साहित्याची उपलब्धता करूण देणे.



गावातील पडीक व्यायामशाळेची सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner

* प्रकरण - ८ *

**लोकसहभागाचे काम :**

(अ) पिशवीकडून खोतवाडीकडे जाणाऱ्या रोडची सुरक्षा व संवर्धन (दुरदृष्टीतून) करणे गरजेचे आहे.

(ब) सद्यस्थितीत या रोडचे थळाकडील बाजूने उत्खनन व ढासळणी चालू आहे. हे उत्खनन त्वरीत बंद न केल्यास भविष्यामध्ये पिशवी व खोतवाडी यांचा संपर्क तुटू शकतो.

(क) यासाठी थळाकडील गल्लीत निर्देश फलक लावणे गरजेचे आहे. व लोकांच्यामध्ये जनजागृती घडवून आणणे गरजेचे आहे.



खोतवाडीकडे जाणाऱ्या रोडच्या बुरुमाची घसरण व उत्खनन सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६



Scanned by CamScanner



खोतवाडीकडे जाणाऱ्या रोडच्या बुरुमाची घसरण व उत्खनन सद्यस्थिती दि. १६/०७/२०१६

*** प्रकरण - ९ ***

**हागणदारी मुक्त गांव :**

**भाग - १ : सध्याची स्थिती**

(अ) पिशवी-खोतवाडी रोडवरती पिण्याच्या पाण्याच्या टाकीपासून सहाशे मीटर अंतरावर अजूनही गावातील काही लोक उघड्यावर शौचालयास बसतात. परिणामी पावसाळ्यामध्ये तेथील सांडपाणी हे थेट पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी येते.

(ब) गावामध्ये प्रवेश करण्याच्या ठिकाणीच काही लोक अजूनही उघड्यावर शौचालयास बसतात.

(क) तळ्याकडील रोडवरतीही अजूनही उघड्यावर शौचालयाची स्थिती आहे.

(ड) शेंडावाडीकडील (शिवाजी इंगवले यांच्या घरासमोरील रोड) रोड याठिकाणीही उघड्यावर शौचालयाची स्थिती आहे.

**भाग - २ : अपेक्षित उपाय**

(अ) वरीलपैकी अपेक्षित सर्व ठिकाणी निर्देश फलक लावणे.

(ब) फक्त निर्देश व आदेश फलक लावून परिस्थिती सुधारणार नाही तर त्याच्यावर कठोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

(क) अशाठिकाणी असा निर्देश फलक लावणे गरजेचे आहे की, जेणेकरून लोकांची मानसिकता बदलेल व स्वच्छतेविषयी जागरुकता निर्माण होईल.



Scanned by CamScanner

* प्रकरण - १० *

छोट्या साप्ताहिक बाजारपेठेचे नियोजन.

बाजारपेठेसाठी प्रस्तावित ठिकाणे :

(अ) पिसाई देवी मंदिर व ग्रामपंचायत कार्यालयासमोर.

(ब) सध्याच्या नवीन प्राथमिक मराठी शाळेच्या आवारात. (सुट्टीच्या दिवशी)

(क) गायरानमधील जागा (देवमाळ) क्रिडांगण.

(ड) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ. (स्मशानभूमीकडे जाणारा रोड)

* प्रकरण - ११ *

गावचे सुशोभित प्रवेशद्वार :

(अ) गावामध्ये प्रवेश करताना आकर्षित व सुशोभित असे प्रवेशद्वार उभारणे.

(ब) प्रवेशद्वारापासून किमान ४०० मीटर अंतरावर रस्त्याच्या दोन्ही बांजूंना समांतर उंचीपेक्षा थोडी जास्त उंचीची पक्की गटारे बांधणे.

(क) रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पक्की आकर्षक साईट पट्टी तयार करणे.

(ड) साईडपट्टी व गटारे यांच्या मधोमध पक्की 'कॅरी' बनवून तिच्यामध्ये शोची 'हॅज' तयार करणे.

* प्रकरण - १२ *

घंटागाडीची सुविधा :

(अ) गावामधील कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडीची सुविधा करणे.

(ब) गावातील सार्वजनिक व आपत्कालीन कामासाठी घंटागाडीचा उपयोग करता येईल.

तरी आम्ही ठरविलेल्या आराखड्यातील कामांना प्राधान्य देवून त्याची पुर्तता करावी हि विनंती.

कळावे,

आपले विश्वासू

(जालिंदर रंगराव इंगवले)

अर्जामध्ये सहभागी असणारे सर्व सदस्व व ग्रामस्थ

१. श्री. सुभाष आनंदा पाटील ----------------

२. श्री. नामदेव महिपती पाटील ----------------



Scanned by CamScanner

३. श्री. श्रीकांत सखाराम पाटील

४. श्री. अजय चंदू पाटील

५. श्री. आनंदा सखाराम साळवी

६. श्री. पांडुरंग श्रीपती मनुगडे

७. श्री. विशाल प्रकाश पाटील

८. श्री. जोतिराम कृष्णा शिंदे

९. श्री. अविनाश भगवान पाटील

१०. श्री. कृष्णा आबा पाटील

११. श्री. किसन मारुती अतिग्रे

१२. श्री. शरद भगवान जाधव

१३. श्री. कुमार ज्ञानदेव जाधव

१४. श्री. बाबासो भगवान पाटील

१५. श्री. ज्ञानदेव श्रीपती मनुगडे

१६. श्री. किरण मारुती पाटील

१७. श्री. रोहित किसन जाधव

१८. श्री. किशोर ~~बळवंत~~ रामदास पाटील

१९. श्री. सुनिल रामदास पाटील

२०. श्री. दत्तात्रय ~~रामदास~~ पांडुरंग पाटील

२१. श्री. नागेश गोविंद पाटील

२२. श्री. उमेश रंगराव पाटील

२३. श्री. तानाजी श्रीपती मनुगडे

२४. श्री. महेश ज्ञानदेव जाधव

२५. श्री. दत्तात्रय धोंडिराम पाटील

२६. श्री. उमेश बळीराम पावले



Scanned by CamScanner

२७) विकास आनंदा मगदूम -

२८) आनंदा लक्ष्मण पाटील -

२९) एकनाथ वसंत पाटील -

३०) दिपक बळवंत पाटील -

३१) धोंडीराम रामचंद्र पाटील - धोंडीराम रामचंद्र पाटील

३२) शिवाजी कृष्णा पाटील -

३३) शिवाजी दामाजी पाटील -

३४) विश्वास गोविंद पाटील -

३५) विठ्ठल राजाराम पाटील -

३६) दाजी मधुकर पाटील -

३७) संजय भाऊ पाटील -
(शिवनेरी पतसंस्था, चेअरमन)

३८) अक्षय आनंदा पाटील -

३९) विनायक रघुनाथ पाटील -

४०) संदीप श्रीपती पाटील -

४१) पांडूरंग निवृत्ती सुतार -

४२) महादेव तुकाराम जाधव - M T J

४३) संजय मारुती पाटील -

Scanned by CamScanner

# * महीला वर्ग *

1) सौ. साधना सर्जेराव पाटील

2) सौ. सुनिता पांडूरंग ~~पाटील~~ मनूगडे

3) सौ. लक्ष्मी प्रकाश पाटील L.P. PATIL

4) सौ. सुलाताई कृष्णा पाटील — S:K:P

5) सौ. सुनिता गोविंद जाधव सौ सु गो जाधव

6) सौ. स्नेहल सचिन जाधव

(८)

Scanned by CamScanner

श्री. स्माइ कॉर्नर पिंपरी

नांवे | | सही

1) भाऊसाहेब रामदास आतिगे
2) सचिन तुकाराम पाटील
3) महादेव बकीराम जाधव
4) बळवंत श्रीपती पाटील
5) रतन बकीराम रासवे

10) सुनील नामदेव पाटील
11) बंडू रामचंद्र पाटील

Scanned by CamScanner

दत्ता आनंदा शिर्के — [signature]

शिवाजी शंकर पाटील —

निक संघटना, अध्यक्ष (पिशवी)

बळवंत यशवंत व्हनांगडे —

सर्जेराव ज्ञानू पाटील —

वसंत ईश्वरा पाटील — वसंत ईश्वरा पाटील

निलेश विलास तोडकर — [signature]

बाबूराव ज्ञानू पाटील — [signature]

पान नं १ ते २७.
दि १४/०८/२०१६ ने पोच

[stamp: ग्रामपंचायत पिशवी ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर, स्थापना १९२१]

[signature]
ग्रामसेवक
ग्रामपंचायत पिशवी
ता शाहूवाडी जि.कोल्हापूर

Scanned by CamScanner